॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)



## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२७ (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्ष आणि जळगाव जिल्हा कौशल्य विकास रोजगार केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने १६ जानेवारी २०२५ रोजी पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या रोजगार मेळाव्यात नाशिक, पुणे, मुंबई व जळगाव येथील २५ नामांकित कंपन्या सहभागी होणार आहे. या रोजगार मेळाव्यासाठी विद्यापीठातील सर्व प्रशाळा आणि जळगाव जिल्ह्यातील विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील सर्व पदवीधर व पदव्युत्तर यापुर्वी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी आणि आता अंतीम वर्षात असलेल्या विद्यार्थ्यांना सहभागी होता येणार असून त्यांनी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दिलेल्या लिंकवर जाऊन १० जानेवारी २०२५ पर्यंत नाव नोंदणी करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाच्या 0257-2257346 या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. ज्या कंपन्यांना रोजगार मेळाव्यात सहभागी व्हायचे आहे त्यांनी www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर आपल्या उद्योजक युजर आयडी व पासवर्ड लागइन करून जॉब फेअर या ऑप्शनवर क्लीक करून आपल्या रिक्त पदांची मागणी ही 'जिल्हास्तरीय पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा ऑफलाईन -०२' यामध्ये नोंदवावी असे आवाहन कक्षाचे समन्वयक प्रा. रमेश सरदार व प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा यांनी केले आहे.

**बातमी क्र. २**

जळगाव दि.२७ (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापनशास्त्र प्रशाळेत शनिवार दि. २८ डिसेंबर रोजी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सोशल वेलफेअर अ‍ॅण्ड बिझीनेस मॅनेजमेंट कोलकत्ता येथील व्यवस्थापन शास्त्र विभागप्रमुख प्रा.अर्चना शर्मा यांचे व्याख्यान झाले.

कॉर्पोरेट साम्राज्यवादाचा अंत या विषयावर बोलतांना प्रा. अर्चना शर्मा यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजार, किंमत धोरण, विपणन धोरण यावर उदाहरणासह भाष्य करून सद्याच्या बाजार परिस्थितीची माहिती विद्यार्थ्यांना दिली. प्रशाळेच्या संचालक प्रा. मधुलिका सोनवणे अध्यक्षस्थानी होत्या. यावेळी प्रा.पवित्रा पाटील, प्रा. आर.आर. चव्हाण , प्रा. अतुल बारेकर उपस्थित होते. दामिनी पाटील यांनी समन्वयक म्हणून काम केले. मेघा वारडे व यश सोनवणे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

**बातमी क्र. ३**

जळगाव दि.२७ (प्रतिनीधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या योगशास्त्र विभागाच्या वतीने दि. १० ते २४ डिसेंबर या कालावधीत प्राणायाम कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेत संथ श्वसन, दीर्घ श्वसन, शुध्दी क्रिया, तसेच प्राणायामाचे विविध प्रकार याविषयी शास्त्रशुध्द मार्गदर्शन करण्यात आले. प्रा. गितांजली भंगाळे यांनी ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने ही कार्यशाळा घेतली. विभागप्रमुख इंजि. राजेश पाटील व डॉ. लिना चौधरी यांच्या उपस्थितीत समारोप झाला. डॉ. शीतल वाघ व अनिकेत पाटील या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. ४२ विद्यार्थी यामध्ये सहभागी झाले होते.

.....................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २८ डिसेंबर, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ. सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी

जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२८ (प्रतिनीधी) : राज्यशासनाने दि. १ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' हा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला असून त्या अनुषंगाने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात व संलग्नित महाविद्यालयात वाचन पंधरवडा आयोजित करण्यात आला आहे.

या पंधरवडाच्या आधी दि. ३० व ३१ डिसेंबर रोजी विद्यापीठाच्या ज्ञानस्त्रोत केंद्रात ग्रंथ प्रदर्शन होणार आहे. दि. १ जानेवारी रोजी ज्ञानस्त्रोत केंद्रामार्फत विद्यार्थ्यांना वाचनासाठी अवांतर पुस्तके उपलब्ध करून दिली जातील व वाचन कौशल्य कार्यशाळा घेण्यात येणार आहे. दि. ३ ते ७ जानेवारी याकालावधीत 'लेखक आपल्या भेटीला' या उपक्रमात ॲड सुशील अत्रे, अशोक कोतवाल व राजु बाविस्कर यांचे व्याख्यान होणार आहे. दि. १६ जानेवारी रोजी महाविद्यालयांमध्ये पुस्तक परीक्षण व कथन स्पर्धा होईल. या स्पर्धेतील विजेत्यांना दि. २६ जानेवारी रोजी महाविद्यालयामार्फत प्रोत्साहनपर प्रमाणपत्र व विद्यापीठामार्फत पारितोषिक दिले जाणार आहे. अशी माहिती विद्यापीठाच्या वतीने ज्ञानस्त्रोत केंद्राचे प्रभारी संचालक विजय आहेर यांनी दिली.

.............................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: २८ डिसेंबर, २०२४

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ. सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी